सं.फौ.ख.क्र. ६०२/२०२१
सरकार वि. शशिकांत
नि.क्र.१६.

सरकारतर्फे **साक्षदार क्रमांक १** यांची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो कि
नाव - **श्रीराम गोदरू नानवटकर,**
वय - ५० वर्ष, व्यवसाय – चालक,
राहणार – श्रीकृष्णमंदीर, जुनी वस्ती, ता. मौदा, जिल्हा - नागपूर.

**<u>सरतपास शपथेवर सरकारतर्फे सरकारी अभियोक्ता श्री. एस. जी. इंगळे यांच्यामार्फत</u>**

**१.** दि.०४.०७.२०२१ रोजी पोलीसांनी मला पंचनामा करीता समंस दिले नव्हते. आता मला समंस दाखवण्यात आला. त्यावर माझी सही अनुक्रमांक २ वर असून त्यातील मजकूर मला माहिती नाही. सदर समंसवरील सहीला **निशाणी क्र.१७** देण्यात येत आहे.

**२.** आता मला घटनास्थळ व जप्ती पंचनामा दाखवला. तो माझ्या समक्ष तयार केला नव्हता. त्यावर माझी सही अनुक्रमांक २ वर असून त्यातील मजकूर मला माहिती नाही. सदर घटनास्थळ व जप्ती पंचनामावरील सहीला **निशाणी क्र.१८** देण्यात येत आहे.

**साक्षीदार सर तपासात सहकार्य करीत नसल्याने सरकारी वकिलांनी साक्षीदारास उलट तपास सदृश प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली परवानगी देण्यात आली.**

**३.** हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या समक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला होता व त्यानंतर मी त्यावर सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला मौजा शिवालीक ढाबा, बोरगाव येथे बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलींसानी माझ्या समक्ष १२ निपा देशी दारू जप्त केल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही कि, आरोपीला वाचवण्यासाठी आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>सरतपास पूर्ण.</u>**

**उलटतपास आरोपीचे विद्वान वकील श्रीमती. एम. एम. तवर यांनी नाकारला.**

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत. समक्ष,

मौदा. स्वा/-

दिनांक १०.०३.२०२६ **(एन.के. वानखडे)**

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग मौदा.